| | | |
|---|---|---|
| दावा दाखल तारीख | : | २२—०३—२०१८ |
| दावा नोंद तारीख | : | २२—०३—२०१८ |
| निकाल तारीख | : | २८—०३—२०१८ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | ०० : ०० : ०७ |

**सिंधुदुर्ग—ओरोस येथील जिल्हा न्यायाधीश—१यांचे न्यायालयात.**

(श्री. एम. बी. तिडके,जिल्हा न्यायाधीश—१यांचे समोर)

**निवडणुक अपिल क्रमांक ०१/२०१८.**

**निशाणी क्रमांक—**

सौ. शितल रामदास मांजरेकर )
वय सु.३४ वर्षे, धंदा: गृहीणी, ) अपीलार्थी
रा. गांगोवाडी, ता.कणकवली, जि. सिंधुदुर्ग. )

**विरूध्द**

१. निवडणुक निर्णय अधिकारी, )
नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुक २०१८ )
कणकवली )

२. सौ. माही मंदार परुळेकर, )
वय सु. ३० वर्षे, धंदा: गृहिणी, )
रा. गांगोवाडी, कणकवली ता.कणकवली )
जि.सिंधुदुर्ग. )

३. सौ. माधुरी सोमनाथ गायकवाड, ) उत्तरवादी
वय सु. ४० वर्षे, धंदा: गृहिणी, )
रा. गांगोवाडी, कणकवली ता.कणकवली )
जि.सिंधुदुर्ग. )

४. सौ. प्रिया अमित मयेकर, )
वय सु. २८ वर्षे, धंदा: गृहिणी, )
रा. जळकेवाडी, कणकवली ता.कणकवली )
जि.सिंधुदुर्ग. )

५. सौ. स्वाती अजित काणेकर, )
वय सु. २८ वर्षे, धंदा: गृहिणी, )
रा. टेंबवाडी, कणकवली ता.कणकवली )
जि.सिंधुदुर्ग. )

---

| | |
|---|---|
| अपिलार्थी तर्फे वकील | : श्री. व्ही.आर.नाईक |
| उत्तरवादी क्र. १ तर्फे वकील | : जिल्हा सरकारी वकील |

---

**—:— न्यायनिर्णय —:—**

( दिनांक : २८.०३.२०१८ )

०१. अपिलार्थी सौ. शितल रामदास मांजरेकर हीने कणकवली नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता प्रभाग क्र. १० इतरमागासवर्ग महिला या प्रवर्गाकरीता राखीव असलेल्या मतदार संघातून नामनिदेशन पत्र दाखल केले होते. सामनेवाला क्र. १ यांनी तिचा अर्ज अवैध ठरविला त्या निर्णयाविरुध्द सदरचे अपिल तिने महाराष्ट्र नगरपालिका निवडणुक नियम १९६६ चे नियम १५ प्रमाणे दाखल केले आहे.

०२. अपिलार्थीचे म्हणणेप्रमाणे वरील मतदार संघातुन तिने वरील निवडणुकीकरीता भारतीय जनता पक्ष आणि अपक्ष असे दोन नामनिर्देशन पत्र दाखल केलेले होते. सामनेवाली क्र. २,३,४ व ५ यांनी अ.क्र. शिवसेना, स्वाभिमान, भारतीय जनता पक्ष व कॉंग्रेस या राष्ट्रीय पक्षाकडुन स्वत:ची नामनिर्देशन पत्रे दाखल केली आहेत. अपिलार्थी भंडारी या इतरमागासवर्गीय प्रवर्गाच्या असुन त्यांनी तीचे जात प्रमाणपत्र दि. २१/०६/२००५ रोजी उपविभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडून मिळविले आहे.

०३. नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुक चे कार्यक्रमाप्रमाणे उमेदवाराचे नामनिर्देशन पत्राचे अर्ज दि. १९/०३/२०१८ रोजी घेण्यात आले. सामनेवाला क्र. २ हिने अपिलार्थी हिचे कडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्याने तिचे उमेदवारीवर आक्षेप घेतला. तो आक्षेप लक्षात घेवुन निवडणुक निर्णय अधिकारी यांनी अर्ज अवैध ठरविला.

०४. सदरहु अपिल दाखल करण्याची कारणे—

अ) निवडणुक निर्णय अधिका—यांचा निर्णय साफ चुकीचा आहे. ब) निवडणुक निर्णय अधिकारी यांनी अपिर्लार्थी हीस तिची बाजु मांडण्याची योग्य व वाजवी संधी उपलब्ध करुन दिलेली नाही. क) निवडणुक निर्णय अधिकारी यांनी महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या अधिनियम क्र. २१/२०१८ दि. २०/०३/२०१८ चा वापर करुन अपिलार्थी हीचे नामनिर्देशन पत्र जात वैधता प्रमाणपत्रा अभावी देखील वैध ठरविणे आवश्यक

होते. ड) अपिलार्थी हिने नामनिर्देशन पत्रासोबत उपविभागीय अधिकारी, कणकवली यांनी दिलेले जात प्रमाणपत्र, तसेच जात पडताळणी समितीकडे तपासणी करीता दिलेली अर्जाची पावती नामनिर्दशन अर्जासोबत दिलेली होती. त्याचा निवडणुक निर्णय अधिका—यांनी विचार केलेला नाही. दि. २०/०३/२०१८ रोजी अधिनियम क्र. २१/१८ आधारे स्थानिक स्वराज्य संस्थाचा अधिनियमांमध्ये बदल करण्यात आलेले होते. त्याचा फायदा निवडणुक निर्णय अधिकारी यांनी दिलेला नाही. अपिलार्थी हिचा वैधानिक अधिकार डावलण्यात आलेला आहे.

०५. अशी सर्व कारणे नमुद करुन निवडणुक निर्णय अधिकारी यांनी क्र. नपसानि/२०१८/निवडणुक छाननी/आक्षेप/०३/२०१८ चे आदेशाने अपिलार्थी हिचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरवण्याकरीता दिलेला निर्णय रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०६. अपिलार्थीचे वकीलांनी युक्तीवाद केला की, शासननिर्णया नुसार नामनिर्देशन पत्रासोबत संबंधित उमेदवारांना जातीचा दाखला तसेच जात पडताळणी समितीकडे अर्ज केलेली पावतीची प्रत व निवडून आल्यास ६ महिन्याच्या अवधीत जात पडताळणी प्रमाणपत्र हजर करणे अशी हमी दिलेस उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र स्वीकारावे अशा मार्गदर्शक सुचना केलल्या आहेत. त्यामुळे अपिलार्थी हिने अर्जाची पुर्तता केली नसल्यामुळे तिचा अर्ज नाकारणे हे सर्वथः चुकीचे आहे. जिल्हा सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, नविन शासन निर्णय दि. २०/०३/२०१८ रोजी नाम निर्देशन पत्र भरण्याची शेवटची मुदत असल्यावरच लागु होतो. या प्रकरणामध्ये नाम निर्देशन स्विकारण्याचा शेवटचा दि. १९/०३/२०१८ आहे. शासन निर्णय त्यानंतरचा म्हणजेच २०/०३/२०१८चा आहे. त्यामुळे अपिलार्थी चे नामनिर्देशन पत्र हे नविन शासकीय निर्णयाच्या कक्षेत येत नाही.

०७. अपिलार्थी व सामनेवाले यांची परस्पर विरोधी कथने आणि प्रतिकथने तसेच दोन्ही बाजुचे युक्तीवाद ऐकुन खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील माझा निष्कर्ष व त्याची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | निवडणुक निर्णय अधिकारी यांनी क्र. नपसानि/२०१८/निवडणुक छाननी/आक्षेप/०३/२०१८ चे आदेशाने अपिलार्थी हिचे नाम निर्देशन पत्र अवैध ठरविण्याचा निर्णय रद्द करणेस पात्र आहे का? | .... 'नकारार्थी' |
| २. | काय हुकूमनामा ? | ....'अंतिम आदेशाप्रमाणे' |

:: **कारणमिमांसा** ::

**मुद्दा क्र. १ते २ करिता** :—

०८. अपिलासोबत अपिलार्थी यांनी सामनेवाला क्र. १ यांनी आक्षेपा वरील दिलेली निर्णयाची प्रत हजर केली. सामनेवाला क्र. १ यांनी नि. ९ सोबत नगरपरिषद व नगरपंचायत मधील सार्वत्रिक व पोट निवडणुक २०१८ निवडणुकीचे पुर्व तयारी बद्दलचे आदेश, नगरपरिषद व नगरपंचायतींची नावे असलेली परिशिष्ठ २ यादी, तसेच निवडणुक कार्यक्रम परिशिष्ठ १ आणि २ तसेच महाराष्ट्र अधिनियम २१/०२/२०१८, २०/०३/२०१८ इत्यांदी कागदपत्रे हजर केली. महाराष्ट्र ॲक्ट XXI/२०१८ यातील तरतुदींची प्रत हजर केली.

०९. अपिलातील कळीचा मुद्दा म्हणजे महाराष्ट्र अधिनियम क्र. २१/२०१८ यातील प्रकरण ४ मध्ये अधिनियम ६ मधील महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम १ (अ) मध्ये केले प्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे का? ती अशी आहे की, '' परंतु, राज्य निवडणुक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणुक कार्यक्रमांनुसार, सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटच दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरु होणा—या आणि ३० जून २०१९ रोजी संपणा—या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतत जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापुर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला

जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत— (एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुंरावा आणि (दोन) ती निवडणुक आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र''. अधिनियम ७ मध्ये १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४० च्या कलम ५१ (१) ब मध्ये त्याच अनुषंगाने निवडणुक अधिकारी यांनी दि. २०/०३/२०१८ रोजी सदरचा निर्णय दिलेला आहे. दि. १७/०३/२०१८ रोजी अर्ज दाखल केल्याचे दिसते. परिशिष्ठ १ नुसार नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी १२/०३/२०१८ (सोमवार) ते १९/०३/२०१८(सोमवार) (स.११.०० ते दु. ०३.००) पर्यंत आहे. म्हणजेच हा कालावधी दि. २०/०३/२०१८ पासुन अंमलात आलेल्या सुधारीत शासन निर्णयाच्या आरंभ तारखेच्या अगोदरचा आहे. अशारितीने अपिलार्थीने दाखल केलेले नामनिर्देशन पत्र वरीलप्रमाणे कालावधीतले असल्याने तिला नविन शासन निर्णयाचा फायदा मिळणार नाही. अपिलार्थीने जात पडताळणी समितीकडे अर्ज केला अगर कसे या बाबबत काही कागदोपत्री पुरावा नाही. असो एकुणच वरील निरीक्षणामुळे हे अपिल मान्य करता येणारे नाही. सामनेवाला क्र. १ निवडणुक निर्णय अधिकारी यांनी दि. २०/०३/२०१८ रोजी दिलेला निर्णय त्यामुळे रद्द होणेस पात्र नाही. अशा प्रकारे मुद्यांची उत्तरे देवुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**—:— <u>आदेश</u> —:—**

१.	अपील फेटाळणेत येत आहे.

२.	खर्चाबद्दल हुकुमनामा नाही.

(न्यायनिर्णय न्यायासनावरुन जाहिर केला.)

सही/—

स्थळ : ओरोस.
दिनांक : २८.०३.२०१८.

( एम.बी.तिडके )
जिल्हा न्यायाधीश १,
सिंधुदुर्ग—ओरोस.